# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २०

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरुवार दिनांक २४/०७/२०२५ दुपारी ५-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| ८. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| ९. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १०. | श्री चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| ११. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १२. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापा विभाग |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १४. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १५. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| १६. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १७. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १८. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १९. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २१. | श्री संभाजी सुडके | लिपीक शिक्षणमंडळ |
| २२. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २४. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २५. | श्री दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |

मा.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१७० धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित आकृतीबंध मंजूर करावयाच्या अनुषंगाने शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेरनिर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपायुक्त दि. ४/३/२०१६ ला धुळे मनपाचा आकृतीबंध मंजुर झालेला आहे. त्यामध्ये २२७४ पदे मंजुर होती तसेचदि. ५ जानेवारी २०१८ ला ११ गावांची हददवाढ झालेली आहे. हददवाढीमुळे क्षेत्रफळ व लोकसंख्या देखील वाढली आहे. त्यामुळे सुधारीत आकृतीबंध तयार करणे आवश्यक आहे. तसेच ९ जुन २०२५ रोजी सेवा विषयी १५० दिवसांचा कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यामुळे सदर घटकाला १० मार्क आहे म्हणुन धुळे मनपाचा सुधारीत आकृतीबंध तयार केला आहे. यामध्ये सुरुवातीला ४५२७ पदांचा आकृतीबंध तयार केला होता. परंतु १४/७/२०२५ रोजीच्या महासभेत सदर विषय तहकुब ठेवला होता. त्यानंतर २१/७/२०२५ रोजी बैठक घेतली होती. त्यानुसार नविन आकृतीबंधात २०५५ पदे वाढली आहे. असेएकुण ४२७९ पदे आहे त्यात २४८ पदे कमी केली आहे. ४२७९ पदांचा सुधारीत आकृतीबंध तयार झाला आहे. हा आकृतीबंध मे. महासभेच्या मंजुरीनंतर शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात कोण कोणती पदे समाविष्ट आहे.

लिपीक (आस्थापना) आयुक्त कार्यालय येथे ९ पदे मंजुर होती. आता २ पदे वाढवली असे एकुण ११ पदे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक २ पदे कुठले वाढवले

लिपीक (आस्थापना) १ स्विय सहाय्यक, व १ शिपाई , अतिरीक्त आयुक्त कार्यालयासाठी पहिले ७ पदे मंजुर होते. नव्याने ९ पदे केले आहे. असे एकुण १६ पदे आहेत. १ अति. आयुक्त पद वाढवले आहे.लघुउच्च श्रेणी-१, स्विय सहा. -१, लिपीक टंकलेखक-१, वाहनचालक-३, शिपाई-२ असे पदे आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक आपल्याकडे १२३ पदांचा पदभरतीचा विषय अजुन पेडींग आहे. यात ॲडिशनल लायबीलीटी क्रिएट करुन उपयोग नाही. २२७४ पदे आहेत आणि ४२७९ केले म्हणजेचे डबल पदे करत आहेत. डबल पदे करतांना वरिष्ठ पदे वाढवावी. लिपीक,एस.आय. वाढवा, लेखा स्टाफ वाढवा. प्रभाग कार्यालय होतील तेथे स्टाफ प्रॉपर द्यावे. आपण आकृतीबंध देतांना रिॲलिस्टीक दिल तर होणारी काटछाट कमी होते.

उपायुक्त यात जुनी जे सफाई कर्मचारी यांची पदे आहेत, ते ७५० च्या आसपास आहे. तर अतिरीक्त ५० किमी चा एरिया वाढला आहे. त्या अनुषंगाने ५०० नविन सफाई कामगार त्यात समाविष्ठ केले आहे. त्यामुळे तो आकडा वाढला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात किती पदे आहेत जी भरली नाही अशी

लिपीक (आस्थापना) १०२१ पदे आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक ड्रायव्हरची पदे किती व्हॅकंट आहे.

लिपीक साधारण ५० पदे रिक्त आहे. ५८ मंजुर आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आपण जे आहेत ते पदे भरली नाही. त्यात ५० लोकांना आक्युपाय कुठे करणार हा देखील प्रश्न आहे. तेवढया गाडया देखील नाही मनपाकडे आहेत या सगळया रेंटवरील गाडया आहेत. त्यामुळे रिॲलिस्टीक आकृतीबंध द्यावा. आधीचा आकृतीबंध होता तेव्हा पदे भरण्यासाठी जी मान्यता दिली ती एक वेळची बाब म्हणुन प्रशासकीय खर्च जो येतो, तो ३५ टक्के च्या आत असला पाहिजे. त्याला शासनाने सुट दिली. १२६ पदे अजुन भरलेली नाही. काही पदे आऊटसोर्सिंग सुध्दा करता येतील. मागील सभेत विषय तहकुब करण्याचे कारण तेच होत. जी सर्विस लागणार आहे ती जास्तीची माणसे देता येतील. इंजिनीयर, लिपीक टंकलेखक यासारखी पदे द्यावी. पुन्हा नव्याने सर्व पदांची पडताळणी करुन विषय सादर करावा. तोपर्यंत विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७० दिनांक १४/०७/२०२५**

मे. महासभेत दिलेल्या निर्देशानुसार अहवाल फेरसादर करण्यात आलेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आस्थापना विभागाने परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-६ मध्ये नमूद आकृतीबंधातील पदांबाबत पुनश्च आढावा घ्यावा. यात वाहनचालक, शिपाई, वॉचमन इत्यादी अनुषंगीक पदांची आवश्यकता तथा गरज तसेच शासन निर्देश तपासून पुनश्च सादर करावा. तापावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१७१ धुळे महानगरपालिकेकरिता सुधारित सेवाप्रवेश नियम मंजूर करावयाच्या अनुषंगाने शासनाकडेस प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर फेरनिर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपायुक्त यामध्ये १६५ संवर्गाचा R R करायचा आहे. सदरचा विषय देखील आकृतीबंधाच्या अनुषंगानेच आहे. हा देखील विषय शासनाकडेस सादर करायचा आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सन २०१६ चा जो R R होता. तो २०२२ मध्ये अॅड ऑन केले त्यात जेथे आवश्यक वाटत त्या गोष्टी पुन्हा व्हेरिफाय करुन घ्याव्या. पदोन्नती संदर्भातले जीआर सर्व तपासुन घ्यावे. त्या हिशोबाने त्याला काऊंटर करणारी प्रोव्हिजन वाटते का R R मधील बघुन ती संपवा. हा विषय देखील फेरसादर करावा.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७१ दिनांक १४/०७/२०२५**

शासनाने धुळे महानगरपालिकेकरिता एकूण ११२ पदांचे सेवाप्रवेश नियम मंजूर करुन दिलेला आहे. तसेच शासनाने धुळे महानगरपालिकेकरिता एकूण ३४ पदांचा सुधारित सेवाप्रवेश नियम विहीत करण्यात आलेला आहे. तसेच धुळे महानगरपालिका आकृतीबंध, २०१६ नुसार धुळे महानगरपालिकेतील आजपावेतो कामकाज सुरु आहे. परंतु कालांतराने धुळे महानगरपालिकेतील विविध विभागातील वाढते कामकाज, आवश्यक कर्मचारी यांची संख्या व नव्याने निर्माण होणारे विभाग याकरिता नव्याने कर्मचारी आवश्यक असल्याने सुधारित आकृतीबंध मंजूर घेणेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

मे. महासभेत दिलेल्या निर्देशानुसार अहवाल फेरसादर करण्यात आलेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आस्थापना विभागाने परिशिष्ट – १ ते परिशिष्ट – ४ अन्वये सुधारित एकत्रित सेवाप्रवेश नियमांचा प्रारुप मसूदा तपासून पुनश्च सादर करावा. तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-१७२ धुळे जिल्हा क्रिडा संकुलातील अंतर्गत मालमत्तेस मालमत्ता कर आकरणी माफ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपायुक्त कर धुळे शहरातील धुळे जिल्हयाचे संकुल आहे. त्यावर आज रोजी मनपाला देणे लागणारी थकबाकी आहे ४६,७५,१८८/- रुपये त्यामध्ये सामान्य कर ३९,३०,१९२/- आहे. आणि इतर कर ७,४४,९९६/- आहे. ही सर्व माफ करावी, असा विनंती अर्ज आपल्याला प्राप्त झाला होता. जिल्हा क्रिडा अधिकारी यांचा,परंतु एप्रिल २०२५ रोजी मा. पालकमंत्री तथा अध्यक्ष जिल्हा क्रिडा संकुल समिती, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक बैठक झाली होती. बैठकीच्या इतिवृत्तानुसार संकुलात सुरु असणाऱ्या मुलांचे व मुलींचे वसतीगृह, जलतरण तलाव, इनडोअर हॉल, व लॉन टेनिस कोर्ट या क्रिडा सुविधा सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरात येत असल्यामुळे व त्यामुळे संकुलाचा कोणताही नफा कमावण्याचा उददेश नसल्यामुळे हा संपुर्ण कर माफ करावा असे निर्देश मा. पालकमंत्री यांनी दिले होते. त्याअनुषंगाने अधिनियमातील तरतुदींचा अभ्यास केल्यावर असे दिसुन आले की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील कलम १३२ (ब) व (क) अन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात न येणाऱ्या इमारतींना सामान्य करापासुन सुट देता येईल. असे नमुद आहे. त्या अनुषंगाने सदर क्रिडा संकुलातील केवळ क्रिडा सुविधांच्या अंतर्गत येणाऱ्या मालमत्तांचा सामान्य कर माफ करणेबाबत हा विषय सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक मा. पालकमंत्री महोदयांच्या बैठकीत हा विषय चर्चेत होता. यासंदर्भात त्या कार्यालयाला टॅक्स लावावा. कलम १३२ (ब) व (क) नुसार यात सुट देण्यात यावी. तसेच त्यांचे कार्यालय आहे त्याला मात्र टॅक्स लावावा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७२ दिनांक १४/०७/२०२५**

शासनाच्या क्रीडा धोरणांतर्गत राज्यातील प्रत्येक विभागीय मुख्यालयाचे ठिकाणी, जिल्हा मुख्यालयचे ठिकाणी व तालुका मुख्यालयाचे ठिकाणी अनुक्रमे विभागीय, जिल्हा व तालुका क्रिडा संकुलाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट शासनाच्या क्रिडा धोरण नुसार राज्यातील प्रत्येक नागरीकांचे आरोग्य सुदृढ रहावे तसेच राज्यातील प्रत्येक खेळाडुस अदयावत सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांच्यातील क्रिडा गुणावाव देणे तसेच त्यातुनच राज्याचे तसेच देशाचे नांव राष्टीय पातळीवर चमकविणारे खेळाडू निमार्ण व्हावे हा सदर सुविधा निर्माण करणे पाठीमागचा मुळे उददेश आहे.

या संदर्भात दिनांक 26 एप्रिल 2025 रोजी मा. पालाकमंत्री तथा अध्यक्ष, जिल्हा क्रिडा संकुल समिती, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये इनडोअर हॉल, मुले व मुलीचे वसतीसगृह इमारत जलतरण तलाव, लॉन टेनिस कोर्ट क्रिडा सुविधांना महानगरपालिके मार्फत आकारलेला सर्व मालमत्ता कर माफ करण्यात यावा असे निर्देश मा. पालकमंत्री महोदयांनी दिले आहेत. त्यात एकुण रक्कम रु. 46,26,957/- इतकी मालमत्ता करापोटी महानगरपालिका, धुळे यांचेकडुन वांरवार मागणी केली जात आहे. याबाबत सादर करण्यात येते की, जिल्हा क्रीडा संकुलामध्ये निर्माण करण्यात आलेल्या सर्व सुविधा या समाजातील उदयोन्मुख खेळाडुंच्या कौशल्य विकास तसेच नागरीकांचया आरोग्याच्या संवर्धनासाठी निर्माण करण्यात आलेल्या असुन सदर सुविधा ही पायाभुत सुविधे अंतर्गत येते. या सुविधेच्या वापरमधुन मोठया प्रमाणात महसुल जमा होत नाही. तसेच जो काही महसुल जमा होतो त्यामधुन सदर क्रीडा संकुलाच्या दैनंदिन व्यवस्थापन तसेच देखभाल दुरुस्तीसाठी खर्च करण्यात येत असतो या क्रीडा संकुलाचा हेतु हा नफा कमावणे नसुन सुदृढ समाज घडविणे हा आहे. त्यामुळे उपरोक्त नमुद मालमत्ता कर महानगरपालिकेने माफ करावा यासाठी महानगरपालिकेस जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने विनंती केलेली आहे.

संकुलातील क्रीडा सुविधांना कोणताही कर आकारण्यात येवु नये असे निर्देश पालकमंत्री यांनी महोदयांनी दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीत दिलेले आहेत.

सामान्य कर कोणत्या जागांवर बसवायचा यातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 132 (1) (क) अन्वये केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या व व्यापारासाठी किंवा फायदा मिळविण्यासाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश नसलेल्या ज्या इमारती व जमिनी '[शासनामध्ये] निहित आहेत किंवा ज्या इमारती व जमिनी महानगरपालिकेमध्ये निहित आहेत व ज्यांच्या बाबतीत उक्त कर बसवला असता तर यात यापुढे दिलेल्या तरतुदींन्वये तो अनुक्रमे प्रथमतः '[शासनाकडून] किंवा महानगरपालिकेकडून वसूल करता आला असता त्या इमारती व जमिनी अशी तरतुद आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व झालेल्या चर्चेनुसार धुळे जिल्हा क्रिडा संकुलातील फक्त इनडोअर हॉल, मुले व मुलीचे वसतीसगृह इमारत जलतरण तलाव, लॉन टेनिस कोर्ट या क्रिडा सुविधांसाठी असलेल्या मालमत्ता पायाभूत सुविधे अंतर्गत नागरीक व खेळाडूंच्या कौशल्य विकासासाठी येत असून सदर मालमत्ता सार्वजनिक प्रयोजनासाठी तसेच व्यापारी किंवा फायदा मिळवण्यासाठी वापरण्यात येत नसल्याने सदर मालमत्तेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 132 (1) (ब) व (क) अन्वये मालमत्ता कर आकारणीतील सामान्य कर आकारणी माफ करणेस मान्यता देणेत येत आहे.

जिल्हा क्रिडा कार्यालयाची इमारत व इतर मालमत्तांना अधिनियमानुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७३ — महात्मा गांधी पुतळा दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता धुळे हददीमध्ये महात्मा गांधी पुतळा १९४८ साली बांधण्यात आला होता. सदर पुतळा हा शहराच्या मध्यवर्ती भागात असुन महामार्गाच्या केंद्र स्थानी आहे. सद्यस्थितीत सदर पुतळयाच्या भोवतालचा परीसर वाईट अवस्थेत आहे. त्यामुळे सदर पुतळा सुशोभिकरण तसेच आवश्यक ती दुरुस्ती व नुतनीकरण कामी सदरचा विषय महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे सर्व नुतनीकरण व दुरुस्ती करुन घ्या. त्याची कल्पना एस.पी. ऑफिस व कलेकटर ऑफिस यांना देण्यात यावी. तसेच तेथील अतिक्रमण काढावा. १५ ऑगस्टच्या आत हे काम झाले पाहिजे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७३ दिनांक १४/०७/२०२५**

धुळे शहर हद्दीमध्ये महात्मा गांधी पुतळा १९४८ साली बांधण्यात आला होता. सदर पुतळा हा शहराच्या मध्यवर्ती भागात असून मुख्य महामार्गाच्या केंद्रस्थानी आहे. सदर पुतळयाला ऐतिहासिक पार्श्वभूमि आहे.

सद्यस्थितीत सदर पुतळयाच्या भोवतालचा परीसर वाईट अवस्थेत आहे. सदर पुतळाच्या आजू बाजूचे फ्लोअरिंग ना-दुरुस्त झालेला आहे तसेच पुतळयासाठी बांधण्यात आलेला जिना नादुरुस्त झालेला आहे. पुतळयाच्या आजूबाजूच्या परीसरात अतिक्रमण धारक असल्याने पुतळा परीसराचे विद्रुपीकरण होत आहे. अशा परीस्थितीत सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे सदर पुतळा सुशोभिकरण तसेच आवश्यक ती दुरुस्ती व नुतनीकरण तातडीने करणे अत्यावश्यक आहे. यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, महात्मा गांधी पुतळा दुरुस्ती व नुतनीकरण करणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**